दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२४ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 24 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 238 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# दिलगिरी व्यक्त करून जनतेच्या भावनांचा आदर करावा: विषयाला आणखी वाढवू नये

## प्रवीण दरेकरांचा कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंना मैत्रीचा सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळ कामकाज सुरू असताना रमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी हा व्हिडिओ व्हायरल केला होता. त्यानंतर विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरला असून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. यावर माणिकराव कोकाटे यांनी आज पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले की मला रमी खेळता येत नाही. तसेच राजीनामा देण्यासारखे काय केले? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या आजच्या पत्रकार परिषदेवर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी प्रतिक्रिया देत मैत्रीचा सल्ला देखील दिला आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले, जी काही घटना घडली ती जनतेला आवडलेली नाही. अशा वेळेला या विषयावर आपली बाजू आणखी ताकदीने मांडण्यापेक्षा दिलगिरी व्यक्त करून जनतेच्या भावनांचा आदर केला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत समर्पक अशा प्रकारची प्रतिक्रिया दिली आहे. अशा प्रकारची गोष्ट निश्चितच भूषणावह नाही. कारण विधिमंडळाच्या सभागृहात कामकाज करत असताना त्याचे गांभीर्य असणे हे त्यांनी अधोरेखित केले आहे. माणिकराव कोकाटे यांनी हा विषय संपवला पाहिजे, त्याचे तुष्टीकरण करण्याची अवश्यता नाही.पुढे प्रवीण दरेकर म्हणाले, मीडिया पण काही चुकीचे दाखवत नाही. स्वयंस्पष्ट चित्र दिसत आहे, त्यामुळे मीडियात सुद्धा त्यांनी काही जाणीवपूर्वक केले असे समजून मीडियाला दोष देण्यात अर्थ आहे असे मला वाटत नाही. यात आत्मविश्वास असण्याची आवश्यकता नाही, कारण निश्चितच ते राज्यातले ते सिनियर आमदार आहेत. पण, मीच केलेले योग्य आहे असे काही सांगण्याचा खटाटोप करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. त्यांनी विनाकारण विषय वाढू नये, असा माझा त्यांना मित्रत्वाचा सल्ला आहे.

माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. यामुळे सरकारवर विरोधक दबाव टाकत आहेत का? असा प्रश्न त्यांना विचारला असता प्रवीण दरेकर म्हणाले, विरोधकांचे कामच दबाव टाकण्याचे असते. सत्ताधारी पक्षाचे एखादे कृत्य दिसले की त्याचा इश्यू विरोधक करतच असतात. पण आपणच एक प्रकारे विरोधकांना विरोध करण्यासाठी हत्यार देत असतो, अशी प्रतिक्रिया दरेकर यांनी दिली आहे.



# शिरूरमध्ये महावितरणच्या हलगर्जीपणा मुळे ट्रान्सफॉर्मर फुटला; तिघे जखमी

**शिरूर । भाऊसाहेब पंदरकर**

शिरूर जिल्हा पुणे शहरातील सिटी बोरा कॉलेजसमोर मंगळवारी (दि. १७ जुलै) रात्री ९:४० वाजता महावितरणच्या डिपीचा (ट्रान्सफॉर्मर) भीषण स्फोट होऊन गजानन गणपत लकडे यांच्यासह तीन जण अपघातग्रस्त झाले. लकडे यांच्यावर श्री गणेशा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या दुर्घटनेची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कंपनीवर असून, कंपनीकडून सातत्याने बेजबाबदारपणा होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. सदर ठिकाणी असलेल्या डिपीवर क्षमतेपेक्षा जास्त भार (लोड) असल्याने डिपी फुटण्याची ही पहिलीच वेळ नाही. वर्षातून किमान दोन वेळा या ठिकाणी अशा घटना घडत असल्याचे समोर आले आहे.



हा ट्रान्सफॉर्मर शिरूर शहर आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाबुराव नगरला जोडणाऱ्या मुख्य वर्दळीच्या रस्त्यालगत आहे. या मार्गावरून दररोज शाळकरी मुले, नागरिक, अबालवृद्ध यांची ये-जा सुरू असते. अपघाताचा काळ रात्रीचा असल्यामुळे मोठा अनर्थ टळला, मात्र ही घटना दिवसा घडली असती तर मोठी जीवितहानी झाली असती, असा नागरिकांचा सूर आहे.

या घटनेनंतर अपघातग्रस्त गजानन लकडे यांचे मित्र यांनी लोकनेते नाथाभाऊ पाचर्णे यांच्याशी संपर्क साधून मदतीची विनंती केली. त्यांनी तत्काळ बारामती परिमंडळाचे अधीक्षक अभियंता यांना फोन करून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून देत अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याचे निर्देश दिले.शहरातील वाढत्या वीजभाराचा विचार करून महावितरणने वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात अधिक गंभीर घटना घडू शकतात, अशी जनतेत चिंता आहे. त्यामुळे या ठिकाणी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी जोर धरत आहे.

# महावितरण विभाग केज ग्रामीण क्रमांक २ ची ५१ टक्के वसुली पुर्ण

## सहाय्यक कार्यकारी अभियंता बोराटे मडम व उप कार्यकारी अभियंता सय्यद यांच्यासह कर्मचारी लागले कामाला

**केज । प्रतिनिधी**

महावितरण केज ग्रामीण विभाग क्रमांक २ यांनी ५१ टक्के विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे.राहिलेले वसुलीचे काम जोरात चालू आहे.एकुण विज बिल ३३ लाख रुपये वसूल करण्याचे उद्दिष्ट आहे त्यामधील १७ लाख रुपये वसूल झाले आहेत.राहिलेल्या ४९ टक्के विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सहाय्यक अधिकारी श्रीमती बोराटे मडम,उप कार्यकारी अभियंता सय्यद साहेब यांच्या समवेत विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विष्णु तेलंग यांच्या सह विद्युत कर्मचारी विज बिल वसुली करत आहेत. त्यांच्या सोबत पांचाळ,कराड, सोळंके, तांदळे,वैरागे,सांगळे आदी विज वितरण कंपनीचे कर्मचारी मेहनत घेत आहेत.



# दैनिक वादळ वार्ताच्या बीड जिल्हा संपादकपदी कपिल मस्के यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

'दैनिक वादळ वार्ता' या लोकप्रिय स्थानिक वृत्तपत्राच्या बीड जिल्हा संपादकपदी कपिल मस्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वृत्तपत्राचे मुख्य संपादक अजय भांगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रात ही एक महत्त्वपूर्ण बाब मानली जात आहे.



कपिल मस्के हे गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय पत्रकार म्हणून कार्यरत असून, त्यांनी ग्रामीण भागातील समस्यांपासून ते प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर निर्भीडपणे लेखन केले आहे. त्यांची लेखणी नेहमीच सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणारी ठरली आहे. नवीन जबाबदारी स्विकारताना मस्के यांनी सांगितले की, माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दल मी 'दैनिक वादळ वार्ता' परिवाराचा आभारी आहे. मी सदैव सत्य, निर्भीड व जनहित पत्रकारितेला प्राधान्य देत राहीन.या नियुक्तीनंतर अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि वाचकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसा निमित्त नायगाव येथे रक्तदान शिबिर मोठ्या उत्सवात संपन्न

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित आमदार राजेशजी पवार व सौ पुनमताई राजेशजी पवार यांच्या मार्गदर्शनामध्ये नायगाव येथे आदरणीय महाराष्टाचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त भव्य रक्तदान शिबिर नायगाव येथे आयोजित करण्यात आले होते. रक्त संकलन करण्यासाठी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय विष्णुपुरी ब्लड ब्यॉंक नांदेड तसेंच अर्पण ब्लड सेंटर नांदेड या दोन ब्लडब्यॉंकेने रक्त संकलन केलेले आहेत. या वेळी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते,तसेच पदाधिकारी,आणि आमदार राजेशजी पवार व सौ पुनमताई राजेशजी पवार यांच्या विचाराने प्रेरित झालेले प्रत्येकाने या रक्तदान शिबिरामध्ये सहभाग घेतला होता.या रक्तदान शिबीरास श्रीहरी देशमुख (भाजपा दक्षिण नायगाव तालुकाध्यक्ष)तसेच बालाजीराव मदेवाड साहेब ( भाजपा नायगाव तालुका अध्यक्ष ) देविदास पा. बोमनाळे, बाबासाहेब प्रल्हाद पाटील हाबर्डे हुसेकर सूर्याजी पा. चाडकर, दत्ता पा. ढगे,आवकाश पा. धुपेकर, बळीराम पा. वडजे,राजू पा. बेळगे,जयश्री ताई नरवाडे, प्रतिभाताई धानोरकर, पलविताई वडजे,महेश पा. होटाळकर आदिजन उपस्थितीत होते.




# अपंग व्यक्ती संदिप सिरसट यांचे कुटुंबासह आमरण उपोषण

## पालवन चौक नरसोबा नगर येथील नालीच्या घाण पाण्याचा बंदोबस्त करा

**बीड । प्रतिनिधी**

अपंग व्यक्ती संदिप सिरसट यांनी नगर परिषद बीड कार्यालय समोर सर्व कुटुंबासहित आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या समस्या गंभीर असल्याने, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी हे उपोषण सुरू करण्याचा विचार केला आहे.संदिप यांचे घर पालवन चौक येथे आहे, आणि तिथे राहात असलेल्या शेजारील घरमालकांचे घानपाणी येत आहे. पश्चिमेकडील नाल्याचा पाण्याचा मार्ग अडविल्याने सर्व घानपाणी संदिप यांच्या घरासमोर साचत आहे. या परिस्थितीमुळे कुंटूबांतील लहान मुले आजारी पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

संदिप सिरसट यांनी ११ जुलै २०२५ रोजी नगर परिषद बीडच्या मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करून घानपाण्याची विल्हेवाट करण्याची मागणी केली. परंतु, त्यांच्या निवेदनाला कोणतीही दखल घेतली गेली नाही.यामुळे निराश झालेल्या संदिप यांनी २४ जुलै २०२५ रोजी नगर परिषद बीडच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपोषणाद्वारे त्यांनी नगर परिषदेच्या प्रशासनाला त्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्यास भाग पाडण्याचा हेतू ठेवला आहे. संदिप यांचे हे उपोषण समाजात जागरूकता निर्माण करण्यास आणि अपंग व्यक्तींना मिळणाऱ्या अधिकारांची आवाज उठवण्यास सहाय्य करेल, असा विश्वास आहे.



# तीन आमदारांसह जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी रविंद्र शिंदे आणि उपाध्यक्षपदी संजय डोंगरे यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली. या पार्श्वभूमीवर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आमदार किशोर जोरगेवार, आमदार किर्तिकुमार भांगडिया आणि आमदार करण देवतळे यांच्या सोबत उमरेड येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

मुख्यमंत्र्यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. चंद्रपूर जिल्ह्यातील सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी बँकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची ठरली. यावेळी बँकेचे संचालक मंडळही उपस्थित होते. ही भेट सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली असून जिल्ह्यातील आर्थिक विकास, सहकारी संस्थांचे मजबुतीकरण व शेतकऱ्यांपर्यंत कर्जपुरवठा सुलभ करण्यासाठी ही भेट महत्त्वाची ठरणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यावेळी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

संपादकीय

## लोहमार्गावरचे जीवघेणे कोंडवाडे



मुंबईच्या उपनगरी रेल्वेतील जीवघेणी गर्दी आणि गैरव्यवस्थापन वारंवार प्रवाशांच्या जीवावर बेतते आहे. दिवा-मुंब्रा येथे झालेल्या अपघाताने रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर प्रकाश टाकला आहे. अपुऱ्या सुविधा, रखडलेले प्रकल्प आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

महामुंबईची जीवनवाहिनी असलेली उपनगरी रेल्वे ही प्रत्यक्षात जीवघेण्या कोंडवाड्यांप्रमाणेच असते, याचा दाहक प्रत्यय आठवड्याच्या प्रारंभीच आला. दिवा-मुंब्रा या मध्य रेल्वेवरील गर्दीच्या स्थानकांदरम्यान कसारा लोकलमध्ये झालेल्या अपघातात उमद्या वयातील कमावती माणसे मरणाच्या दारात फेकली गेली. त्यातून वाचले त्यांनाही आयुष्यभराची झुंज चुकलेली नाही. उपनगरी रेल्वेप्रवाशांनी कायम कोंडवाड्यात कोंबलेल्या गुरा-ढोरांप्रमाणेच प्रवास करावा, असे सर्वांनी गृहीत धरले आहे काय? उपनगरी रेल्वेतून दिवसाला सरासरी सहा ते सात जणांचा मृत्यू ओढवतो. लोकलच्या फुटबोर्डावरून प्रवास करणे हा रेल्वे कायद्यानुसार गुन्हा धरला जातो; परंतु असा प्रवास करण्यास रेल्वेची गैरव्यवस्थाच भाग पाडते.

अपघातानंतर सर्व उपनगरी गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसविण्याची घोषणा रेल्वेने करून टाकली. जिवाच्या सुरक्षेसाठी तसे करायलाही हरकत नाही. परंतु अशा दरवाजामुळे विलंब होऊन प्रवाशांच्या वाट्याची एखादी गाडी कमी होऊ शकते किंवा प्रवासी वाहून नेण्याची क्षमता. त्यामुळे सरकत्या दरवाजाची घोषणा कुचकामीच ठरण्याची शक्यता अधिक.

रेल्वेच्या बाबतीत कोणतीही दुर्घटना ही 'क्सिडेंट वेटिंग टू हॅपन' म्हणजेच 'हे तर कधीही घडू शकले असते,' या स्वरूपाची असते. गेल्या काही वर्षांत ठाण्यापासून पुढे कल्याण, बदलापूर, अंबरनाथ तसेच ट्रान्सहार्बर मार्गावर वाशी, पनवेलपर्यंत आणि पश्चिम उपनगरांत विरार-डहाणूपर्यंत प्रवासीसंख्या कमालीची वाढली आहे. तीन वर्षांपूर्वी ठाणे ते दिवादरम्यान दोन मार्गिका नव्याने टाकण्यात आल्या. पाचव्या-सहाव्या ट्रॅकमुळे ठाणे-कल्याण मार्गावर फेऱ्या वाढतील, ही प्रवाशांची अपेक्षा मात्र फोल ठरली. ज्या काही गाड्या वाढविल्या, त्यापैकी बहुतेक गाड्या पूर्वीच्या गाड्यांच्या बदल्यात वातानुकूलित, इतकाच काय तो बदल झाला. तोही प्रवाशांच्या जिवावर उठणाराच ठरला. पारसिक टेकडीवर जीव धोक्यात घालून लोक राहतात. न करो, परंतु इथे दुर्घटना घडल्यास, पारसिकच्या बोगद्याचे तोंडच बंद होऊ शकते. गेल्या १२ वर्षांत १५ डब्यांच्या गाड्यांच्या फेऱ्यात वाढ झालेली नाही.

ट्रान्सहार्बर मार्गावर दिघा रेल्वेस्थानकाची उभारणी रडतखडत झाली; परंतु बेकायदा झोपड्यांपायी हा रेल्वेमार्ग कळव्याला जोडण्याचे काम रखडले आहे. साहजिकच ठाण्याचे दहाही फलाट तिन्हीत्रिकाळ गर्दीने ओसंडून वाहत असतात. या परिसरातील आमदार, खासदार व नेतेमंडळी केवळ झोपड्यांच्या रदबदलीसाठी आंदोलने करतात. समस्येवर ठोस तोडगा सुचवत नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई व महाराष्ट्राच्या खासदारांनी आणि नेतेमंडळींनी उपनगरी रेल्वेचे प्रश्न दिल्लीदरबारी किती गांभीर्याने लावून धरले, हा संशोधनाचा विषय ठरेल. रस्त्यांच्या प्रकल्पांचे आकडे हजारो कोटींच्या घरात असतात, उपनगरी रेल्वे प्रकल्प कमी खर्चाचे असतात, हे त्याचे कारण असावे काय?

कोव्हिडनंतर उपनगरी रेल्वेने पुन्हा ७० लाखांच्या प्रवासीसंख्येपर्यंत मजल मारली आहे. परंतु, लोहमार्ग पाण्याखाली जावोत किंवा ओव्हरहेड वायर तुटो; लोकलमध्ये बसलेल्या प्रवाशांना त्याची माहिती मिळण्याची सुतराम शक्यता नसते. इंडिकेटरवरील वेळांशी तर लोकलच्या वक्तशीरपणाचा छत्तीसचा आकडा असतो. उद्घोषणेद्वारे माहिती देण्याची प्रशासनाला गरज वाटत नाही. एकेका लोकलला होणारा विलंब म्हणजे गर्दी वाढल्याने प्रवाशांच्या जिवाशी खेळच असतो. गळकी छपरे, बंद पंखे, रखडलेले पूल हे तर प्रवाशांच्या पाचवीलाच पूजलेले.दिवा-मुंब्रासारख्या घटना घडल्यास मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी प्रश्नांना सामोरे जायला हवे. शाही आणि सुस्त कारभाराची सवय जडलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांनी स्वतः बदलापूर किंवा नालासोपाऱ्यातून दुसऱ्या वर्गाने रांगेत तिकीट काढून गर्दीच्या वेळी किंवा मेगाब्लॉकच्या दिवशी प्रवास करावा, तरच त्यांना प्रवाशांच्या यातनांची जाणीव होईल. गर्दीच्या वेळी तर तिकीट तपासनीसही गाडीत शिरायला धजावत नाहीत. स्वच्छतेच्या बाबतीत तेवढे रेल्वेला आपण गुण देऊ शकतो. मात्र रेल्वेचे प्रगतिपुस्तक धुळीस मिळविण्यासाठी आपले नागरिक सज्ज आहेत. मग रेल्वेची शक्ती लोहमार्गाच्या कुंपणावर जाळ्या लावण्यात खर्ची होते.

मुंबईतील लोंढ्यांवरून हाकारे देणाऱ्यांपासून ते वाहतुकीच्या समृद्धीचे गुणगान करणाऱ्यांपर्यंत कोणत्याही राजकारण्यांनी मुंबईच्या उपनगरी रेल्वेच्या प्रश्नांचा सज्जडपणे व सातत्याने पाठपुरावा केलेला नाही. कार्यालयांच्या वेळा बदलण्याचा उत्साह काही दिवस टिकला; परंतु त्यातून लक्षणीय काही हाती लागलेले नाही. लोकलच्या गर्दीत लळत-लोंबत प्रवास करणारे कर्मचारी महापालिका, मंत्रालय, पोलिस आणि खासगी आस्थापनांची कार्यालये गाठतात. मात्र मुकी बिचारी कुणीही हाका, अशी त्यांची केविलवाणी स्थिती आहे.

# आयपीएल नावाची दंत कथा वास्तवात उतरलेली

आयपीएल या नावाने क्रिकेटचा महासंग्राम २००८ साली सुरू झाला. त्यावेळी केवळ आठ संघ होते. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. कसोटी क्रिकेट कंटाळवाणे होऊ लागले म्हणून एकदिवसीय मर्यादित क्रिकेटचे सामने सुरू झाले. तेही कंटाळवाणे होऊ लागले तेव्हा बीसीसीआयच्या सुपीक डोक्यातून आयपीएल ही क्रिकेटची महास्पर्धा सुरू करण्याचा बेत शिजला. त्याचे जनक होते ललित मोदी. हा सारा इतिहास सर्वांना ठाऊक आहे. पण आयपीएलचे एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे आयपीएल सामने कधीही कंटाळवाणे होत नाहीत. त्यात प्रेक्षकांना कंटाळा न आणणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. जसे की चिअरलीडर्स, खेळाच्या नियमात बदल केले गेले आणि आता तर डीआरएसच्या नियमातही बदल करण्यात आले आहेत.

सर्वांचा उद्देश एकच आहे तो म्हणजे आयपीएल सामने कधीही कंटाळवाणे होऊ नयेत. या उद्देशाला बीसीसीआय पुरेपूर उतरली आहे असे म्हणावे लागेल. यंदा तर खेळाडूंना सलायव्हा लावण्याची परवानगी देण्यात आली होती. कारण गेली दोन वर्षे कोविडमुळे सलायव्हा लावण्यास बंदी होती. आता तीही पुरी करण्यात आली. इंग्लंडचा माजी ग्रेट क्रिकेटपटू डेनिस कॉम्प्टन हा तर आयपीएलला मनोरंजनाचा कार्यक्रम मानत असे. हे क्रिकेट नाहीच असे त्याचे म्हणणे होते. पण कॉम्प्टनचे काहीही म्हणणे असो, आज आयपीएल आपल्या उद्देशात सफल झाले आहे. तीन तास लोक टीव्हीला खिळून राहतात आणि तेही सायंकाळचे तीन तास त्यामुळे लोकांना दिवसभराची कामे करून आयपीएलची मजा लुटता येते. हा एक मोठा फायदा आहे.




आयपीएलमुळे भारताला चांगले खेळाडू मिळाले हे नाकारता येणार नाही. आयपीएलमुळेच वैभव सूर्यवंशी सारखा १३ वर्षांचा स्टार मिळाला किंवा आयपीएलमुळेच साई सुदर्शन आणि श्रेयस अय्यर यांच्यासारखे गुणवान क्रिकेटपटू मिळाले हे नाकारता येणार नाही. आयपीएलच्या काही मायनस पॉइंटही आहेत. त्यात आहे अर्थातच गोलंदाजाची कबर खणली जाते. संपूर्ण आयपीएल स्पर्धेचा फॉरमॅट असा आहे की, त्यात गोलंदाजांना काही वावच राहू नये. त्यामुळे सारे काही फलंदाजांसाठी चालले आहे असे वाटते. पण त्यातही काही सकारात्मक बाजू आहेत. जसे की फलंदाजाच्या बॅट तपासून घेतल्या जातात आणि त्यांची रूंदी नियमाप्रमाणे जास्त नाही ना हे तपासण्याची पंचांना मुभा असते.

यंदाच्या आयपीएलमध्ये तर फलंदाजांनीच आपली बॅट तपासून घेतल्याचे आपण पाहिले. यंदाच्या आयपीएलने आपल्याला कोणते नवीन क्रिकेटपटू आणि स्टार दिले याचा विचार केला तर पहिल्यांदा नाव येते ते १३ वर्षांचा वैभव सूर्यवंशीचे. त्याचा जन्म बिहारमधील समस्तीपूरचा. त्याने बिहारचे नाव दिगंतात झळकवले ते आपल्या गुजरात टायटन्सविरुद्ध शतकी खेळी करून आणि समोर गोलंदाज होते ते गुजरातचे तुफान वेग असणारे. वैभवने गुजरातविरुद्ध तुफानी १०१ धावा केल्या आणि त्याची शतकी भागीदारी प्रचंड गाजली. वैभवने वयाच्या १३व्या वर्षी हा चमत्कार केला तर चेन्नईच्या आयुष म्हात्रेने अवघ्या सतराव्या वर्षी जोरदार धावा करून आपल्या आगमनाची ग्वाही दिली.

त्याने शतकी खेळी वगैरे केली नाही पण त्याची गुणवत्ता कोणत्याही मोठ्या क्रिकेटपटूइतकीच महान होती. गुजरातचा साई सुदर्शन असाच एक लक्षवेधी खेळाडू ठरला. त्याने यंदाच्या आयपीएलमध्ये तब्बल ७५९ धावा केल्या, त्याचे वय आहे अवघे २३ वर्षे. त्याने ऑरेंज कॅप आपल्या नावावर केली. तर अनेक विक्रम यंदाच्या आयपीएलमध्येही झाले. हैदराबादचा अभिषेक शर्माने एकाच सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम यंदा केला. त्याने पंजाब किंग्जविरुद्ध खेळताना ५५ चेंडूंत १४१ धावांची तुफानी खेळी केली. हा विक्रम आहे. पण असे अनेक विक्रम आहेत जे की इतिहासात नोंदवले जातील.

यंदाच्या आयपीएलचे वैशिष्ट्य हे आहे की, लक्ष्याचा तोही कल्पनातीत अशा लक्ष्याचा पाठलाग यशस्वीपणे करण्यात आला आणि तोही मुंबईसारख्या संघाच्या लक्ष्याचा. मुंबई इंडियन्स दर्जेदार गोलंदाजांची खाण म्हणून मानला जातो. पण त्या संघाला नेस्तनाबूत करणारे फलंदाज यंदाच्या आयपीएलमध्ये सापडले. यंदाच्या आयपीएलने नवीन विजेता संघ दिला तो म्हणजे आरसीबी अर्थात रॉयल चॅलेंजर्स बंगलूरु. पण त्यांचा कर्णधार रजत पाटीदार आणि विराट कोहली हे साऱ्या खेळाचे स्टार होते. तसेच त्यांचा गोलंदाज कृणाल पांड्या. हार्दिक पांड्याचा हा मोठा भाऊ. पण कृणाल पांड्याने यंदाच्या बंगलूरुकडून खेळताना आयपीएल गाजवली.

पाच वेळेची विजेती राहिलेली चेन्नईची सुपर किंग्ज यंदा मात्र तळाच्या स्थानावर राहिली. त्याबाबत अनेक प्रकारे बोलले गेले. पण वस्तुस्थिती आहे ती आहे. तसेच सनरायझर्स हैदराबाद हा संघ खालच्या स्थानावर राहिला. राजस्थानचा रॉयल्स संघही त्याच्या मागेच आहे. पण त्या संघात काही खरोखरच दर्जेदार खेळाडू होते. पण त्यांचे काहीच झाले नाही. अखेर संघ बाराच्या भावात गेला तो गेलाच. दिल्लीच्या संघाचीही तीच गत झाली. के. एल. राहुल आणि कंपनीसारखे वरिष्ठ खेळाडू असतानाही संघ काही करामत करू शकला नाही.

पण गुजरात अखेरपर्यंत टॉप राहिला आणि शेवटच्या क्षणी त्याने माती खाल्ली, तीही मुंबईसमोर. पण पंजाब आणि बंगळूरु हे संघ शेवटपर्यंत राहिले आणि अखेरच्या क्षणी पंजाबचा शशांक सिंगने अखेरच्या ६१ धावा केल्या पण त्या अपुऱ्या ठरल्या आणि पंजाबचा संघ बंगलूरुने दिलेले लक्ष्य साध्य करू शकला नाही. आयपीएलचे एक महापर्व संपले. या महापर्वाची अखेर मात्र शोकांतिका झाली. त्याला कोण जबाबदार आहेत त्याची चौकशी होईल. रीतसर बंगलूरुच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. अचानक आनंदाच्या सोहळ्याचे रूपांतर शोकपर्वात झाले. चेंगराचेंगरी होऊन अनेकांचा जीव गेला. कित्येकांची स्वप्ने तशीच राहिली. पण यंदाच्या आयपीएलची ही एक दुखरी बाजू सोडली तर आयपीएल हा एक आनंदसोहळा ठरला.

# लोकलची जीवघेणी गर्दी, निरपराध प्रवाशांचे बळी

मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात.

एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल आणि विरार, पालघर, डहाणूपर्यंत लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते?



मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, कळवा, डोंबिवली, कल्याण तसेच अंधेरी, वसई-विरार या स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी या लोकल जात असताना दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले.

धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वत:चा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत.

गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत. मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे.

गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१,८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात.

प्रथम श्रेणीच्या डब्यातही विनातिकीट लोकांची अगदी महिलांचीही बरीच गर्दी असते. आपल्याला तिकीट कोणी विचारायला येणार नाही याची त्यांना खात्री असते. विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते पण धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिखारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते.

हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात, लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा कुठे दिसत नाही. लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण कुठे रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे.

# जनसंग्राम संघटनेच्या सोनपेठ तालुकाध्यक्षपदी कुशांभर कदम तर युवक आघाडीच्या तालुका उपाध्यक्षपदी कलींदर यांची निवड

## जनसंग्राम संघटनेचे विचार तळागाळातील घटकापर्यंत पोहोचवण्या साठी प्रयत्न करावेत–संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार

**सोनपेठ । प्रतिनिधी**

नेक कर्म, मानवता हाच धर्म हे ब्रीद घेऊन निघालेल्या जनसंग्राम संघटनेच्या सोनपेठ तालुका अध्यक्षपदी कुशांभर कदम तर युवक आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष पदी बालाजी कलींदर यांची निवड नुकतीच करण्यात आली. सोनपेठ तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. सोनपेठ तालुक्याची जनसंग्राम संघटनेची महत्वपूर्ण बैठक दि.२३ जुलै२०२५ रोजी निळा येथे पार पडली. संदरील बैठकीस जनसंग्राम संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत सर्वानुमते सोनपेठ तालुकाध्यक्षपदी कुशांभर कदम तर युवक आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष पदी बालाजी कलींदर यांची निवड संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र तसेच शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून सत्कार करून करण्यात आली.

यावेळी जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार कार्यकर्ता बैठकीस संबोधित करताना म्हणाले की, जनसंग्राम संघटनेच्या माध्यमातून आपल्याला गरजवंतांच्या, वंचितांच्या, रंजल्या-गांजल्यांच्या अडचणी सोडवायच्या आहेत. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे तत्व उराशी बाळगून नेक कर्म, मानवता हाच धर्म... हे ब्रीद हाती घेऊन वाटचाल करायची आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी जनसंग्राम संघटनेचे विचार तळागाळातील घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी जनसंग्राम संघटनेच्या शाखा गावोगावी उघडाव्यात. व जनसंग्राम संघटनेची व्यापक चळवळ निर्माण करावी. असेही पवार म्हणाले. या प्रसंगी नवनिर्वाचित जनसंग्राम संघटनेचे सोनपेठ तालुकाध्यक्ष कुशांभर कदम, युवक आघाडीचे तालुका उपाध्यक्ष बालाजी कलींदर यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी ऊकडगाव चे सरपंच भाऊसाहेब मोरे, अल्पसंख्यांक आघाडी तालुकाध्यक्ष परळी वहाब पटेल, जनसंग्राम संघटना अल्पसंख्यांक आघाडीचे परळी शहराध्यक्ष शेख हबीबभाई मिस्त्री, मोहन बेद्रे, ओमकार गुंजाळ, सुदर्शन हरंगुळे, बालाजी कलिंदर, वैभव कलिंदर, अर्जुन बेद्रे, महारुद्र कसबे, अमर चव्हाण, ओमकार कलिंदर, निलेश गीते, पांडुरंग बोडके, संजय इंगळे, गजानन रेवले, साहेबराव दंडवते, भरत रेवले, गोपीनाथ जाधव, श्रीराम जाधव, माणिक शिंदे, ऊकडगाव चे सरपंच भाऊसाहेब मोरे, लक्ष्मण महाराज, अमर चव्हाण, मुंजाभाऊ आढाव, माऊली कदम, माणिक शिंदे, बंडू आढाव आदिसह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिव्यात जोडे मोरो आंदोलनाने आ.हेमंत पाटलांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध

**ठाणे । प्रतिनिधी**

विधान परिषदेतील आमदार हेमंत पाटील यांच्या आंबेडकरी समाजाविरोधी वादग्रस्त विधानामुळे दिव्यात तीव्र संतापाची लाट उसळली. या पार्श्वभूमीवर आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते व बौद्ध समाजाच्या वतीने जोडे मोरो आंदोलन करत जोरदार निषेध नोंदवण्यात आलामा. हेमंत पाटील यांनी विधनसभेत आंबेडकरी समाजाला अर्बन नक्षलवादी, ब्लॅकमेलर आणि ट्रॉसिटी करून खंडणी वसूल करणारे असे अवमानकारक, खालच्या पातळीचे आणि जातीय तेढ वाढवणारे विधान केले. हे विधान प्रसारमाध्यमांद्वारे समाजापर्यंत पोहोचताच सामाजिक सलोखा भंगण्याची परिस्थिती निर्माण झाली. या वक्तव्यामुळे त्यांची खोलवर रुजलेली जातीवादी मानसिकता उघड झाली आहे.हे केवळ आंबेडकरी समाजाचे नाही, तर भारतीय संविधान, मानवाधिकार आणि सामाजिक समतेच्या मूल्यांचेही अपमान करणारे विधान असल्याची प्रतिक्रिया आंदोलकांनी व्यक्त केली. नांदेड जिल्ह्यातील बोंढार येथील अक्षय भालेराव याचा जातीय द्वेषातून खून, परभणीतील संविधान पुतळ्याची विटंबना, पोलीस कोठडीत दलित




युवकाचा संशयास्पद मृत्यू, आणि आदिवासी डॉक्टरवर झालेला अत्याचार – या घटनांचा दाखला देत बौद्ध समाजाच्या वतीने पाटलांच्या विधानाचा तीव्र शब्दांत निषेध केला.अखिल आंबेडकरी समाजाच्या वतीने सर्व समाज, आंबेडकरी अनुयायी, पक्ष,संघटना,शाखा,महिला मंडळ पधादिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिव्यात मुंबई लोकल सुरु करण्यासाठी एल्गार मोर्चा

# होम फलाट होऊन लोकल सुरु न करणे हे सत्ताधाऱ्यांचे अपयश–विकास इंगळे

**ठाणे । प्रतिनिधी**

सामान्य जनतेचे जीव वाचवण्यासाठी दिवा येथे १ जुलै २०२५ पासून सौ अश्विनी अमोल केंद्रे यांचे बेमुदत धरणे आंदोलनाची दखल न घेतल्याने दिवा भव्य एल्गार मोर्चा काढण्यात आला. सामान्य जनतेची एकच मागणी आहे. दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल चालू व्हावी.यासाठी अनेक आंदोलने केली आहेत. स्वाक्षरी मोहीम घेतली.७ दिवस आमरण उपोषण, मोर्चा, ढोल बजाव आंदोलन केले. तरीही रेल्वे प्रशासन लक्ष देत नाही. प्रत्येक वेळी रेल्वे ट्रॅक्ट , क्रॉसिंग तेच ते उत्तर दिले जात आहे. दिवा येथे होम प्लेट फॉर्म पण आहे. दिवा हे ३ एप्रिल १८६७ वर्षी चे दिवा जंक्शन असून येथे ८ (आठ) प्लेट फॉर्म असूनही सुविधा नाहीत. येथून लोकल चालू केली जात नाही परंतु घाटकोपर , विद्याविहार येथून लोकल सोडली जाते. दिवा शहरातील वाढती लोकसंख्या पाहून दिव्यात लोकल सुरू करणे तसेच दिवा जंक्शन असल्याने सर्व फास्ट लोकल दिवा येथे थांबण्यात येणे अत्यंत गरजेचे आहे. दिवा ते पनवेल लोकल चालू करणेही अत्यंत गरजेचे आहे असे केंद्रे यांनी यावेली बोलताना स्पष्ट केल गेल्या ९ जून रोजी मुंब्रा येथे दुर्घटना घडली अनेकांचे जीव गेले. रेल्वे प्रशासन तेव्हा जाग आली.पण रोज कोणाचा ना कोणाचा जीव जात आहे. यावर कोणीही काही बोलत नाही.दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल चालू झाली तर डोंबिवली मुंब्रा,कळवा येथील प्रवाशांना खूप मोठा दिलासा मिळेल,गर्दी कमी




होईल.कोणाचे जीव जाणार नाहीत.यासाठी एक मराठी महिला सौ अश्विनी अमोल केंद्रे यांनी १ जुलै पासून दिवस रात्र दिवा स्टेशन येथे बेमुदत धरणे आंदोलन करत असून याकडे रेल्वे प्रशासन ,स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दखल घेण्यासाठी वेळ मिळत नाही.हे दुर्दैव म्हणावे लागेल. तसेच बेमुदत आंदोलनास वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा देवून विकास इंगळे हे देखील ४ दिवस झाले आमरण उपोषणास बसले आहेत.जनता दल सेक्युलर महाराष्ट्र ,ऑल इंडिया पँथर सेना,भीम आर्मी,भीम स्वराज्य संघटना,राष्ट्रीय अत्याचार निवारण शक्ती महाराष्ट्र राज्य ,कष्टकरी हॉकर्स युनियन,तसेच सामाजिक संघटना मंडळे यांनी पाठिंबा दिला आहे.भर पावसात एल्गार मोर्चा काढण्यात आला.यावेळी मोर्च्यात अभय दुबे,रामपाल मौर्य, कृष्णा कानडे, विनोद कदम, आनंद पाटील, प्रवीण उतेकर, बबन कांबळे, गजानन शेलार, दीपक पाटील, पूनम कांबळे, सुरेखा तोरणे, धनाजी पवार, डी के खरात, अनिल शिंदे तसेच दिवा शहरातील माता भगिनी वडीलधारे प्रवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांचे व नागरिकांचे आरोग्य धोक्यात; प्रशासन गप्प!

**अलिबाग । प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील झुंझार मैदानाजवळील नवेनगर फाट्याच्या मार्गावर असह्य घाणीमुळे स्थानिक नागरिक आणि शाळकरी विद्यार्थ्यांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. या परिसरात उभारण्यात आलेले डंपिंग ग्राउंड हे रा.जि.प. शाळेच्या अगदी शेजारी असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य सातत्याने बिघडत आहे.गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, नागरिकांनी याबाबत वेळोवेळी तक्रारी करूनही स्थानिक प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे. चायनीज दुकानातील उरलेले पदार्थ, कोंबड्यांची पिसं, बाजारातील सडलेली भाजीपाला व घाण सगळं बेधडकपणे रस्त्यावर टाकलं जातं. यामुळे अर्धा रस्ता कचऱ्याने व्यापला असून वाहतूक खोळंबते, अपघातही वाढले आहेत.



या दुर्गंधीयुक्त कचऱ्यावर भटके कुत्रे मोठ्या प्रमाणात जमा होऊ लागले असून, प्रवास करताना वाहनांच्या समोर कुत्रे धावत असल्यामुळे अनेक अपघात घडत आहेत. पावसात खड्डे पाण्याने भरून जात असल्याने ते नजरेसही न पडता वाहनचालक सरळ त्या खड्ड्यांत पडतात.डंपिंग ग्राउंडमुळे आजूबाजूच्या परिसरात डासांचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे. कोणत्याही प्रकारची फवारणी अथवा जंतुनाशकाची उपाययोजना न झाल्यामुळे साथीचे आजार पसरण्याचा धोका वाढला आहे.

**स्थानिक प्रशासनाकडे विनंती नाही, आता इशारा आहे** –या असह्य परिस्थितीपासून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी स्थानिक प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून डंपिंग ग्राउंड दुसऱ्या ठिकाणी हलवावे, नियमित साफसफाई व फवारणी करावी आणि रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, अशी जोरदार मागणी रहिवाशांनी केली आहे.

## मधुबन कट्ट्यावर फुलल्या रानभाज्यांच्या कविता

**उरण । प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण तर्फे प्रत्येक महिन्यातून एकदा मधुबन कट्टा विमला तलाव येथे कवी संमेलन संपन्न होत असते. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक हिराचंद म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या मधुबन कट्ट्याच्या ११७ व्या कवी संमेलनात कवि मच्छिंद्र म्हात्रे,अजय शिवकर, हेमंत पाटील, बालकवी अनुज शिवकर, अनामिका राम, समता ठाकूर, तेजस्विनी गायकवाड, रायगड भूषण प्राध्यापक एल. बी पाटील, रामचंद्र म्हात्रे,आदी कवींनी रानभाज्यांवर कविता सादर करून काव्य संमेलनाला एक वेगळीच रंगत आली.कवी संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात मधुबन कट्ट्यावर कादंबरीकार गजानन म्हात्रे यांनी ७७ वर्षांपूर्वी चक्रीवादळाच्या तडाख्याने बुडालेल्या रामदास बोटीच्या आठवणी जाग्या केल्या.यावेळी जेष्ठ पत्रकार जगदीश तांडेल यांनी भविष्यात रानभाज्यांचे संवर्धन करण्यासाठी उरण



तालुक्यातील डोंगर माळराने वाचवायला हवी यासाठी खूप मोठ्या प्रमाणात जनजागृतीची गरज आहे असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मच्छिंद्र म्हात्रे यांनी महाराष्ट्रातील रानभाज्यांचा आढावा व महत्त्व विषद केले.त्याचप्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेतर्फे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंढरपूर येथील साहित्यिक वारीचे अनुभव विषद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीव पाटील यांनी केले तर या कवी संमेलनास ज्येष्ठ नागरिक सूर्यकांत दांडेकर ,चंद्रकांत मुकादम, मारुती तांबे, अनिता शिवकर ,मीना बिष्ट रमेश माळी, रवींद्र सूर्यवंशी, महिंद्र सोनवणे ,देविदास पाटील, सुनील पाटील ,अरविंद घरत ,सुरेश ठाकूर, एस ए चव्हाण ,भीमा अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. रायगड भूषण प्राध्यापक एल. बी. पाटील यांनी आगरी पसायदान सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

# अंबाजोगाई शहरातील अंतर्गत येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचा बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा

## रमाई घरकुल लाभार्थ्यांना निधी तात्काळ वितरित करा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आंबेजोगाईत गेल्या बऱ्याच काळापासून वंचित बहुजन आघाडी संबंधित प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकडे पाठपुरा करत असून यापैकी अनेक समस्या सोडविण्यात विलंब होत असल्यामुळे वंचित बहुजन आघाडीने विविध मागण्यांसाठी नगरपरिषद कार्यालय समोर मागण्या पूर्ण होईपर्यंत सोमवार दिनांक २८ जुलै २०२५ रोजी पासून नगरपरिषद कार्यालयीन वेळेत बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा अंबाजोगाई नगर परिषदेला निवेदनाद्वारे दिला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या विविध मागण्या अशा की , गेल्या अनेक दिवसांनी होत असलेली टाळाटाळ थांबून पी टी आर नोंदणी प्रक्रिया जलद गतीने करून अधिकृत प्रमुखाची व वरिष्ठ लिपिकाची नेमणूक करावी व ही प्रक्रिया सुरळीत करण्यात यावी. तसेच भिमाई नगर साकुर परिसर मांडवा रोड ईदगाह परिसर व बिलाल नगर परिसर नगर परिषद हद्दीमध्ये समावेश करत रमाई आवास , पंतप्रधान आवास योजना व शहर विकास योजना या भागात राबविण्यात याव्यात. , अंबाजोगाई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, चौक परिसरात असलेली महात्मा ज्योतिबा फुले नगर या वस्तीतील घर धारकांची पी टी आर नोंदणी करण्यात यावी. व येथील नागरिकांना रमाई आवास व पंतप्रधान आवास घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा. , दिव्यांग बांधवांसाठी असलेला राखीव पाच टक्के निधी लाभार्थ्यांच्या खात्यात वितरित करण्यात आला आहे. त्या रकमेत तफावत असून याची चौकशी करून दिव्यांग बांधवांची उर्वरित रक्कम पाच टक्के प्रमाणेच वितरित करण्यात यावी., नगरपरिषद अंतर्गत असणाऱ्या सर्व शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचे थकीत वेतन अदा करण्यात यावे.,



दुसऱ्या टप्प्यात मंजूर १२३ लाभार्थ्यांचा रमाई आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची प्रक्रिया पूर्ण झाली असून लाभार्थी यांना पहिला हप्ता वितरित करून पुढील प्रक्रिया सुरळीत करण्यात यावी., नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या संगणक विभाग व कंत्राटी कर्मचारी व पाणीपुरवठा विभागातील कामगारांना समान काम किमान वेतन लागू करत सफाई कामगार सह सर्वांचे थकित वेतन दोन दिवसात पदा करण्यात यावे., परळवेस समता नगर भागातील बंद असलेले आरोग्य केंद्र तात्काळ सुरू करून गोरगरीब नागरिकांसाठी रुणालय सुरू करण्यात यावे., एलआयसी ऑफिस मागे असणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत वेळेची मर्यादा कमी असल्याने विद्यार्थी प्रवेश कमी होत आहेत यात सकाळी आठ ते रात्री अकरा वाजेपर्यंत ची वेळ नगरपरिषद मार्फत आवश्यक अपुऱ्या असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा विविध मागण्यांसाठी आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देता वेळेस वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष गोविंद मस्के, शहर महासचिव नितीन सर्वदे, वंचित बहुजन आघाडीचे शहर प्रवक्ते उमेश शिंदे, शहर उपाध्यक्ष शेख रशीद, शहर उपाध्यक्ष धम्मपाल मोरे, श्रीकांत वाघमारे, पवन वेडे, समाधान कसबे, अतुल सोनवणे, सागर उबाळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार,मा.आ.धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धेत के.जी.जी.स्कूल हाळम सर्वप्रथम

**परळी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार , परळी विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे राबविण्यात येत असलेल्या सेवा सप्ताहात स्पर्धेत के जी जी स्कूल हाळम या शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या या दोन्ही वरिष्ठ नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे परळी विधानसभा मतदारसंघामध्ये सेवा सप्ताहअंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये ग्रामीण भागातील गटा मधून , दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष,युवा नेते माधव मुंडे सर यांच्या असलेल्या के जी जी स्कूल हाळम या शाळेतील विद्यार्थ्यांनी शेतकरी थीम सादर करून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला या यशासाठी अथक परिश्रम करणारे सर्व स्टाफ आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख चव्हाण मॅडम ज्ञानेश्वरी फड,पिपळे सर, मॅडम, संजय फड सर,संदीप ओटले सर, वर्मा सर, करुणा मॅडम,आरती फड मॅडम, गंगा सर,सावित्री मॅडम तेजश्री मॅडम,कराड मॅडम,श्री हाके ,सचिन भताने,व सर्व स्टाफनी मेहनत घेऊन हे यश संपादन केले यासाठी सर्वत्र स्तरातून विद्यार्थी व शाळेचे अभिनंदन होत आहे.



## ओ साहेब,भाऊंना सांगा की दादा त्याचं खूप ऐकतात...!

या सादरीकरणाच्या वेळी कु. कीर्ती फड या मुलीने उपस्थित त्यांना वरील डायलॉग बोलून खताचे भाव व सातबारा कोरा करण्याची विनंती उपस्थित नेत्यांच्या समोर आदरणीय धनंजय मुंडे साहेबांच्या माध्यमातून राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांना केली.ग्रामीण भागात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास आकडे लक्ष देऊन केजीजी स्कूल कार्यरत आहे या शाळेच्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य टिळक जयंती उत्साहात साजरी

**केज | प्रतिनिधी**

केज शहरातील नामांकित व गुणवत्तेच्या दृष्टीने अग्रस्थानी असलेल्या पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' असे जाज्वल्य विधान करणाऱ्या टिळकांच्या कार्याची आठवण करून देत विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, नेतृत्व आणि स्वाभिमानाचे मूल्य बिंबवण्याचा यामागे हेतू होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मस्के सर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कै. राम चौरे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक घुले सर व पठाण सर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांचे कार्य आणि विचार याविषयी सखोल मार्गदर्शन केले. टिळकांचे समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार आणि स्वातंत्र्यसेनानी म्हणून विविध पैलू मांडताना त्यांचे विचार आजच्या काळात किती प्रासंगिक आहेत, यावर त्यांनी भर दिला. कार्यक्रमात घुले सर, युवराज मगर सर आणि दळवे मॅडम यांनी आपली मनोगते व्यक्त करताना टिळकांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. त्यांनी टिळकांनी सुरु केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांचे सामाजिक एकतेसाठीचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत नेटकेपणाने अजय भांगे सर यांनी केले. त्यांनी आपल्या निवेदनातून टिळकांचे चरित्र आणि योगदान सहजसोप्या भाषेत उपस्थितांपर्यंत पोहोचवले. या प्रसंगी चौरे मॅडम, डी.एस. चौरे सर, अश्विनी मॅडम, पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम, मुळे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम, अक्षता मॅडम, प्रगती मॅडम, अमृता मॅडम, लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, विशाल सर, राऊत सर, काळे सर, भांगे सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांचे विचार कृतीत उतरवण्याचा निर्धार करत टाळ्यांच्या कडकडाटात कार्यक्रमाची सांगता केली. पवनराजे इंग्लिश स्कूलच्या वतीने घेण्यात आलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीचे बीज पेरणारा व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरला.

# केज तालुक्यातील सुकळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर संपन्न



**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सुकळी (गोटेगाव) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर कळंब, अंबाजोगाई रोड वरील सुकळी (गोटेगाव) येथील निसर्गराजा मंगल कार्यालय येथे दिनांक २३ जुलै २०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यात आले.सदरील शिबीरास युसुफवडगाव मंडळातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबीरास विकास हजारे,मंडळ अधिकारी युसुफ वडगाव यांनी सदरील कार्यक्रमास युसुफ वडगाव मंडळातील ग्राम महसूल अधिकारी खतीब साहेब,वाघमारे मॅडम,नागिले मडम,केंद्रे मॅडम,पूजा मॅडम, सूर्यवंशी मॅडम तसेच कवडे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले शेतकरी,विद्यार्थी व महिला यांना सविस्तर मार्गदर्शन केले.महसूल विभाग,पुरवठा विभाग तसेच कृषी विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते.शेतकरी यांनी अँग्री स्टॅक,पी एम किसान योजना,रेशनकार्ड वरील नाव कमी करणे,नाव वाढविणे,एपीएल डीबीटीचे कामकाज करण्यात आले.उत्पन्न प्रमाणपत्र,जातीचे प्रमाणपत्र काढण्यात आले तसेच संजय गांधी योजना डीबीटी चे कामकाज करण्यात तसेच त्यांनी जनता दरबार घेऊन उपस्थित शेतकऱ्यांची त्यांनी त्यांचे अर्ज,निवेदने स्वीकारली सदरील सर्व उपस्थित मंडळातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरीबांधव,विद्यार्थी, महिला यांचे सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जवळबन येथे ग्रामविकास समिती तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**केज | प्रतिनिधी**

तालुक्यातील जवळबन येथील ग्रामविकास समिती संस्थेतर्फे गावातील ६६ गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपयोगी साहित्य देऊन गुणगौरव करण्यात आला. गावातील ज्या विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनियर तसेच शासकीय सेवांमध्ये नियुक्ती झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. गावातील काही विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत आहेत. त्यापैकी इटली येथे पीएच डी प्राप्त डॉ.सुधीर भाकरे तसेच फिजिओथेरपी पदवी प्राप्त डॉक्टर कुलकर्णी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच पती प्रमोद करपे, प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,प्रा.बळवंते ,जगदीश करपे संस्थेचे कार्यवाह श्री कुलकर्णी उपस्थित होते जि प शाळेचे मुख्याध्यापक,माऊली विद्यालयाचे मुख्याध्यापक, सेवा सोसायटीचे चेअरमन नितीन भाकरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते मुलांकडून अवाजवी गुणवत्तेची अपेक्षा न ठेवता मुलांना त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेऊ द्यावे असे मत कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हनुमंत भोसले यांनी व्यक्त केले विद्यार्थी मार्कवंत होण्यापेक्षा गुणवंत व्हावा असे मत प्रा. बळवंते यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. मुलांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होण्यासाठी तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी गेल्या १८ वर्षापासून संस्थेतर्फे गुणवंताचा सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रास्ताविकातून प्रताप भाकरे यांनी संस्थेच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा इतिहास सांगितला. दोन्ही शाळेतील शैक्षणिक कामकाजाबाबत ग्रामस्थांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ.तानाजी जाधव यांनी केले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लव्हुरी केंद्राची शैक्षणिक शिक्षण परिषद येवता येथे उत्साहात संपन्न-सुनिलराव केंद्रे



**केज | प्रतिनिधी**

दि.२३ रोजी केज तालुक्यातील लव्हूरी केंद्राची शैक्षणिक शिक्षण परिषद येवता येथे दुपारच्या सत्रात १२:३०ते०४:३०वा.आयोजित करण्यात आली प्रमुख मार्गदर्शक म्हणून विध्येमान जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा माजी गटशिक्षणाधिकारी सुनीलराव केंद्रे होते य त्यांनी सविस्तर असे बैठकीस मार्गदर्शन केले शाळा व्यवस्थापन समिती रचना व कार्य,बालविवाह रोखणे प्रतिबंधक व प्रतिज्ञा. पेट परीक्षा,अध्ययन निष्पत्ती इत्यादी विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले सुलभक म्हणून श्रीराम चाटे,चैतन्य तांबेकर, विक्रम डोईफोडे,यांनी काम केले कार्यक्रमास लव्हूरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकृष्ण कांबळे,राजाभाऊ कदम,अंकुश मोराळे, दादाराव गीते,गोकुळ सारूक,नामदेव चौरे,संजय चाळक, गजेंद्र जाधव,हनुमंत कटारे इत्यादी मुख्याधापक व सहशिक्षक आणि ट्रेनि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाळ गंगाधर टिळक आणि संत सावतामाळी यांचे सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान-वसुदेव गायकवाड

**केज | प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक २३ जुलै २०२५ रोजी बाळ गंगाधर टिळक जयंती व संत सावतामाळी यांचे सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,ख्यातनाम वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. ते व्याख्यान देताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते.तर

प्रमुख पाहुणे म्हणून शिवदास अप्पा गायकवाड,नारायण भाऊ गायकवाड,संजय सोनवणे,सेवानिवृत्त ग्रामसेवक एस.पी. गायकवाड,रामकृष्ण तात्या गायकवाड, अरुण गायकवाड यांनी ही उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले.



रविंद्र गायकवाड पेंटर, बन्सीनाना गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांच्यासह वाचकांची उपस्थिती होती.सर्व प्रथम बाळ गंगाधर टिळक व संत सावता माळी यांच्या प्रतिमेला रामराजे गायकवाड, नारायण भाऊ गायकवाड,शिवदास अप्पा गायकवाड, रामकृष्ण तात्या गायकवाड,एस.पी. गायकवाड,संजय सोनवणे,अरुण गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांनच्या पुढाकाराने महिलेला मिळाला न्याय

## दिन दुबळ्याच्या, गोरगरिबांच्या सेवेसाठी टायगर ग्रुप सदैव तत्पर-जाधव

**बीड | प्रतिनिधी**

परळी येथील श्रीनाथ गोविंद गित्ते हे प्राथमिक आश्रमशाळा वसंतनगर, ता. परळी जि. बीड या शाळेत प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग) छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश दि. ३ जुलै २०२५ नुसार शाळेवर रुजू होण्यासाठी वारंवार जाऊन देखील मुलाला रुजू करून घेत नसल्याने टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांनी पुढाकार घेऊन श्रीनाथ गोविंद गीते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिले होते.

आश्रम शाळा व्यवस्थापन व समाज कल्याण बीड मधील अधिकाऱ्याला भ्रष्टाचारणे बरबटल्याने गोविंद गीते यास सेवेवर करून घेण्यास टाळाटाळ केली जात होती. पतीच्या निधनानंतर अनुकंपावर घरातील कुठलाही व्यक्तीस वारसदाराला सेवेत घेतले जाते. सुनीता गीते यांनी प्रचंड संघर्ष करुन स्वतः वरिष्ठ कार्यालयाच्या पायऱ्या झिजवल्या,वरिष्ठांनी रुजू करुन देण्याचे आदेशही दिले. मात्र बीड येथे भ्रष्टाचाराची कीड खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गोविंद गीते यांना अद्याप नोकरी वरती रुजू करून घेतला नाही. सुनीता गीते या स्वतः



कर्करोगाने त्रस्त असुन उपचारासाठी आर्थिक अडचण आहे. मागील अनेक वर्षांपासुन पाठपुरावा करुन मुलाला अनुकंपावर नियुक्ती आदेश दिले असताना देखील संबंधीत शाळा रुजू करुन घेण्यास मनाई करत आहेत. संबंधीत शाळेवर अथवा बीड जिल्हयात कोणत्याही शाळेत अथवा कार्यालयात गोविंद गीते यांना दि. २१/०७/२०२५ पर्यंत रुजु करून न घेतल्यास कार्यालयासमोर दि. २३/०७/२०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला होता.परंतु टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांच्या पुढाकाराने समाज कल्याण आयुक्त यांनी लेखी स्वरूपात दिले. राकेश जाधव यांच्या पुढाकारामुळे आज मला व कुटुंबाला न्याय मिळाल्याचे सुनिता गीते यांनी प्रसार माध्यमाना सांगत राकेश जाधव यांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077